सन २०१८ मधील महाविद्यालयीन कनिष्ठ अधिव्याख्याता (गट-ब) शासकीय संस्था/ महाविद्यालये यांच्या बदल्या...

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन आदेश क्रमांकः बदली-२०१८(९४/१८)/मशि-१
मंत्रालय विस्तार, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ३० मे, २०१८.

आदेश

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियम आणि शासकीय कर्तव्य पार पडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ३(१) मध्ये विहीत केलेल्या तरतूदीस अनुसरुन उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय महाविद्यालये/संस्थांमधील कनिष्ठ अधिव्याख्याता, गट-ब या संवर्गातील ज्या कनिष्ठ अधिव्याख्याता यांचा कालावधी बदल्यांच्या अधिनियमातील कलम ३(१) मध्ये विहित केलेल्या कालावधीपेक्षा जास्त झालेला आहे त्यांच्या खालील विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे परिणामस्वरूपत: (Resultant) बदल्या करण्यात येत आहेत.

अ. क्र.	कनिष्ठ अधिव्याख्यात्यांची नावे	विषय	सध्या कार्यरत असलेले महाविद्यालय/संस्था	बदलीचे ठिकाण	शेरा
१	श्री. एस. जी. गवळी	इंग्रजी	इस्माईल युसुफ महाविद्यालय, मुंबई	सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, मुंबई	प्रशासकीय
२	श्री. निलेश मोहन पाठक	इंग्रजी	सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, मुंबई	इस्माईल युसुफ महाविद्यालय, मुंबई	प्रशासकीय
३	श्रीमती सुहासिनी गेडेकर	जीवशास्त्र	शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती.	शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद	प्रशासकीय
४	श्री. अविनाश शास्त्राकार	जीवशास्त्र	शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद.	शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती.	प्रशासकीय
५	श्रीम. शालिनी राऊत (चौधरी)	रसायनशास्त्र	शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद.	शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती.	प्रशासकीय
६	श्री. आर. पी. सुर्यवंशी	रसायनशास्त्र	एलफिन्स्टन महाविद्यालय, मुंबई.	राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर.	प्रशासकीय

अ. क्र.	कनिष्ठ अधिव्याख्यात्यांची नावे	विषय	सध्या कार्यरत असलेले महाविद्यालय/संस्था	बदलीचे ठिकाण	शेरा
७	डॉ. आशा सी. धुरे	हिंदी	सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, मुंबई	इस्माईल युसुफ महाविद्यालय, मुंबई	प्रशासकीय
८	श्री कैलास विठ्ठल देसले	हिंदी	इस्माईल युसुफ महाविद्यालय, मुंबई	सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, मुंबई	प्रशासकीय

प्रशासकीय कारणास्तव बदली झालेल्या कनिष्ठ अधिव्याख्याता यांना शासन नियमानुसार पदग्रहण अवधी, प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहिल.

बदलीच्या आदेशाची अंमलबजावणी तात्काळ होण्याकरीता संबंधित प्राचार्यांनी खालील सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

१. बदलीबाबतचे आदेश प्राप्त झाल्यानंतर बदली झालेल्या कनिष्ठ अधिव्याख्याता यांच्या जागी पर्यायी कनिष्ठ अधिव्याख्याता हजर होण्याची वाट न पाहता बदली झालेल्या कनिष्ठ अधिव्याख्याता यांना बदलीच्या ठिकाणी रुजू होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करावे.

२. पदस्थापनेत बदल करण्यासंदर्भात कोणत्याही विनंतीची दखल घेण्यात येणार नाही. बदलीच्या आदेशात बदल करुन घेण्यासाठी कोणत्याही कनिष्ठ अधिव्याख्याता यांनी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास असे कनिष्ठ अधिव्याख्याता (गट-ब) शिस्तभंगविषयक कारवाई करण्यास पात्र ठरतील.

३. बदली झालेल्या ठिकाणी रुजू होईपर्यंतच्या कालावधीत कोणत्याही प्रकारची रजा मंजूर करण्यात येणार नाही.

४. सदर बदल्यांची अंमलबजावणी प्रभावीपणे होणे गरजेचे असल्यामुळे बदली झालेल्या सर्व कनिष्ठ अधिव्याख्याता यांच्या कार्यमुक्ततेच्या दिनाकांपर्यंत अथवा जास्तीत जास्त **दिनांक** ३०.०६.२०१८ पर्यंतचे वेतन ते सध्या कार्यरत असलेल्या महाविद्यालयांने काढावे. त्यानंतरचे वेतन कोणत्याही परिस्थितीत बदलीपूर्वीच्या महाविद्यालयात काढण्यात येऊ नये, सदर वेतन संबंधित कनिष्ठ अधिव्याख्याता बदलीच्या महाविद्यालयात रुजू झाल्यानंतर बदलीनंतरच्या महाविद्यालयाने काढावे. **दिनांक** ०१.०७.२०१८ पासूनचे वेतन बदलीपूर्वीच्या कार्यरत असलेल्या महाविद्यालयातून काढण्यात आल्यास त्या महाविद्यालयाच्या आंहरण व संवितरण अधिकारी यांना व्यक्तीशः जबाबदार धरण्यात येईल.

५. हे आदेश तात्काळ अंमलात येतील. बदली झालेले कनिष्ठ अधिव्याख्याता कार्यमुक्त होऊन बदलीच्या ठिकाणी रुजू झाल्याबाबतचा अहवाल संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी **दिनांक** ०१.०७.२०१८ पुर्वी शासनास सादर करावा.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५३०१५२०५५५५०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Manisha Pravin Kini

Digitally signed by Manisha Pravin Kini
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=108cbdac08c7e940866a8fc97bfe7f861bf192ce9dd6b4d0924623149a51f9ed, cn=Manisha Pravin Kini
Date: 2018.05.30 17:54:47 +05'30'

(म.प्र.किणी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
२. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण
३. संबंधीत प्राचार्य, शासकीय महाविद्यालये
४. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
६. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी
७. संबंधित कनिष्ठ अधिव्याख्याता गट-ब
८. निवड नस्ती.

प्रत :- १. मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव.
२. मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव.